# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरूवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२

**( सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )**

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ४)**

(१) **सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, अजित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पंचायत समिती इमारत, खेड आळंदी, जि.पुणे बांधकामाबाबत दिनांक ११/९/२०१९ रोजी व त्यासुमारास कार्यारंभ आदेश देणे, तद्नंतर दिनांक ०७/०७/२०२० रोजी कार्यारंभ आदेश जिल्हा परिषद पुणे यांनी मासिक सभेमध्ये रद्द करुन ठेकेदारांचे ई.एम.डी. देयके अदा करण्याचे ठरवणे, पंचायत समितीचा सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ रोजी सादर करुन रुपये १६ कोटी अदा करणे, मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे सीआर/८/२०२१ पुणे दिनांक २४/०५/२०१९ रोजीचे आदेश जागा नोंद करण्याचे राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम तांत्रिक मंजुरी देणे, राजगुरुनगर इमारत प्रशासकीय मान्यता व बांधकाम नकाशे कार्यरंभ आदेशाआधी प्रशासकीय इमारत बाबत बांधकाम परवानगी देणे, मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे जिल्हा यांच्यासमोर प्रशासकीय इमारत संकुल राजगुरुनगर इमारतीचे सादरीकरण करून सुधारणा करणे, प्रशासकीय इमारत संकुल राजगुरुनगर गट नंबर २०९ व २१० मध्ये इमारत बांधकामास कार्यारंभ आदेश दिनांक ०४/०७/२०२२ रोजी देणे, मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्या आदेश जाक्र/खेड/सीआर/८/२०२२, दि.०७/१०/२०२२ च्या आदेशान्वये जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव रद्द करणे परंतु त्यामध्ये विसंगती दिसून येणे, त्यामुळे मध्यवर्ती प्रशासकीय संकुलाला बांधकाम करण्यास अडथळा निर्माण होणे, खेड आळंदी तालुक्यातील शासकीय कार्यालय विविध ठिकाणी असल्याने कामकाजानिमित्त नागरिकांना गैरसोयीचे होत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण असणे याबाबत शासनाने करावायाची कार्यवाही व भूमिका."

अप्रकाशित

(२) **श्री.भास्कर जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्हा हा सहयाद्री पर्वत रांग व अरबी समुद्र या दोहोंच्यामध्ये वसलेला व मध्यम लोकवस्ती आणि वनसंपदेने नटलेला जिल्हा असणे, जिल्हयातील सुशिक्षित तसेच छोटी-मोठी विविध प्रकारची कामे करणारा कारागिरवर्ग मोठया संख्येने मुंबई, पुणेसारख्या शहरामध्ये वास्तव्याला असणे, उर्वरित स्थानिक नागरिक हे जिल्हयामध्ये असलेले चिरेखाण, वाळू, आंबा, काजू, नारळ, सुपारीच्या बागा, काजू प्रक्रिया उदयोग अशाप्रकारचे लहान-मोठे पारंपारिक उदयोग व मोलमजुरी करून आपली उपजिविका भागवित असणे, यातून बहुतांश कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असणे, असे असताना केंद्र शासनाने पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबतची अधिसूचना प्रसिध्द केलेली असणे, त्यामध्ये रत्नागिरी जिल्हयातील २९३ गावांचा समावेश करण्यात आलेला असणे, वस्तुतः सदर यातील असंख्य गावे ही पश्चिम घाटापासून कितीतरी दूर असून मुंबई-गोवा महामार्गाच्या पश्चिम दिशेत असणे आणि याच गावांमध्ये जांभा दगडासारखे गौण खनिज असून अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे ते साधन असणे, सदर अधिसूचना मंजूर झाल्यास जिल्हयातील पारंपारिक उदयोग संपुष्टात येवून हजारो कुटुंबांवर संकट ओढविण्याची भीती, परिणामी बेरोजगारी वाढण्याची तसेच जिल्हयाच्या पर्यटन विकासावर फार मोठा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता, ही गंभीर बाब लक्षात घेवून पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आलेली गावे तात्काळ वगळण्यात यावीत तसेच पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.विनोद अग्रवाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्हा नवेगाव-नागझीरा व्याघ्र प्रकल्पाकरीता ओळखल्या जात असुन संपूर्ण जिल्हा वनांनी व्याप्त असणे, जिल्हयामध्ये मोठयाप्रमाणात धान पिकासह तुर, चना, मका तथा इतर भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यात येत असणे, जिल्हयातील अनेक शेतकरी बांधवांच्या शेत्या वनांलगत असणे, वनांमधील वन्यप्राणी या शेतातील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान करीत असणे, तसेच वनांलगत असलेल्या गावामध्ये माकड घरांचे कवेलु, तथा इतर सामानांचे सुध्दा नुकसान करीत असणे, माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये ओडीसा राज्यातील २० ते ३० हत्तींचा कळप छत्तीसगड राज्यामार्गे राज्यातील गडचिरोली जिल्ह्यामध्ये शिरणे, गडचिरोली जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात पिकांचे तथा घरांचे नुकसान करीत माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये गोंदिया जिल्ह्यामध्ये शिरणे,

याठिकाणीसुध्दा धान पिकांसह घरांचे नुकसान करीत भंडारा जिल्ह्यामध्ये प्रवेश करणे, त्यामुळे आधिच निसर्गाचे लहरीपणा, नापिकी, किडीचा प्रादुर्भाव यामुळे हवालदिल झालेला शेतकरी बांधव वन्यप्राणी तथा हत्तींमुळे भयग्रस्त झालेलाअसणे, याबाबतवन विभागाकडे वारंवार तक्रारी करून नुकसान भरपाईसह कोणतीही ठोस स्वरूपाची कार्यवाही करण्यात आलेली नसणे, त्यामुळे पूर्व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यातील शेतकरी बांधवांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा शासनाची प्रतिक्रीया."

(४) **सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"युनानी चिकित्सा पद्धती भारतात फार पुरातन काळापासून प्रभावशाली पद्धतीने वापरली जात असणे, आज भारत एक असा प्रमुख देश आहे की जेथे युनानी चिकित्सेचा अभ्यास ही केला जात असणे, तसेच भारतात मोठ्या संख्येने युनानी संशोधन संस्था देखील असणे, आज युनानी औषध प्रणाली मान्यता प्राप्त चिकित्सक रुग्णालय आणि शैक्षणिक व संशोधन संस्था बरोबर राष्ट्रीय आरोग्य देखभाल प्रणालीचा एक अविभाज्य हिस्सा होऊन बसने, सध्या युनानी औषध प्रणाली जनतेत बरीच लोकप्रिय होणे, देशभरात विखुरलेले युनानी चिकित्सेचे चिकित्सक राष्ट्रीय आरोग्य देखरेख वितरण संरचनेचा एक अभिन्न अंग असणे, सरकारी उपलब्ध आकड्यानुसार ४७९६३ पजीकृत युनानी चिकित्सक देशभरात असणे, सध्या १५ राज्यांमध्ये युनानी रुग्णालये असणे, एकंदरीत देशभरातील वेगवेगळया राज्यात कार्यरत असलेली एकूण २६३ इतकी रुग्णालये असणे, देशातील २० राज्यामध्ये युनानी औषधालये असणे, कोरोना काळात युनानी डॉक्टरांनी चांगली कामगिरी करणे,  महाराष्ट्रातील प्रत्येक शहरामध्ये बियूएमएस डॉक्टरांनी मागील काही दशकात चांगली कामगिरी केले असल्याचे निदर्शनास येणे, एमबीबीएस/बीएएमएस बीएचएमएस डॉक्टरांसारखेच बियुएमएस डॉक्टरांना हि मान्यता देण्याची मागणी करण्यात येणे,  बियूएमएस डॉक्टरांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, तसेच शासकीय भरती मध्ये बियूएमएस डॉक्टरांचा समावेश न करण्यात येणे, बियूएमएस डॉक्टरांना शासकीय सेवेत समावेश करून घेण्याबाबत सर्व संघटना युनानी महाविद्यालय व स्तरावरून मागणी करण्यात येणे, मराठवाडा येथे दोन वर्षांपासून पदे रिक्त असताना न भरण्यात येणे, युनानी चिकित्सालयाच्या अटी व शर्ती शासनाकडून मान्य न करण्यात येणे, युनानी विभागाच्या सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी कायम स्वरूपात वैद्यकीय अधिकारी (BUMS) पद उपलब्ध असण्याची अत्यंत आवश्यकता, सदर विषयी वारंवार मागणी करूनही मागणी पूर्ण न होणे, सदर विषयी शासनाने केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री. अजित पवार, अमीन पटेल, लहू कानडे, झीशान सिद्दिकी, हसन मुश्रीफ, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, सुनिल भुसारा, विनोद निकोले, रणधीर सावरकर, गणपत गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील शासनाने लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाईगार कामगारांच्या वारसांना शासकीय सेवेचा लाभ देत असतांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी दिली जात नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास उघडकीस आलेली असणे, शासनाच्या विविध विभागात वर्ग ब व वर्ग क ची अनेक पदे रिक्त असतांनाही सफाईगार कामगारांच्या वारसांना फक्त सफाईगार या पदावर नियुक्ती मिळत असणे, तसेच सद्य:स्थितीत लाड-पागे समिती शिफारशीनुसार नेमणुकीची कार्यवाही करतांना आस्थापना अथवा विभाग बदल्याची तरतूद नसणे, शैक्षणिक पात्रतेनुसार सफाईगार कामगारांच्या वारसांना नियुक्ती मिळत नसल्याने त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी ज्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असते त्याचप्रमाणे लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाईगार कामगारांच्या वारसांना नोकरी देण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करावी व त्यांच्यामार्फत जिल्ह्यात रिक्त असलेल्या विविध विभागात सफाईगार कामगारांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी देण्याबाबत तसेच लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार नेमणुकीची कार्यवाही करतांना आस्थापना अथवा विभाग बदल करण्याची तरतूद करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.बच्चू कडू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात अनुसूचित जाती तसेच अन्य प्रवर्गांसाठी घरकुल योजना शासनातर्फे राबविण्यात येत असणे, घरकुल योजनेमुळे लाखो गरीब लाभार्थ्यांना निवाऱ्याची सोय उपलब्ध होणे, मात्र या योजनेची व्याप्ती मर्यादित असल्याने राज्यातील लाखो पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहणे, राज्यातील ओबीसी प्रवर्गातील तसेच खुल्या प्रवर्गातील लाखो लोक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत असूनही या योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे निवाऱ्या पासून वंचित राहणे,त्याचप्रमाणे राज्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, महिला यांचा ही समावेश या योजनेत नसल्याने आणि दिव्यांग व्यक्तींचाही समावेश नसल्याने राज्यातला एक मोठा वर्ग निवाऱ्याच्या मूलभूत गरजेची पूर्तता होण्यापासून दूर राहिला असणे, राज्य शासनाने या वर्गाची सातत्याने उपेक्षा केल्यामुळे

राज्यातील ओबीसी, तसेच खुल्या प्रवर्गातील अतीगरीब, दिव्यांग, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिला या सर्वांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, राज्य शासनाने या वर्गाची तातडीची गरज लक्षात घेऊन या वर्गाचा समावेश घरकुल योजनेत करण्याची या वर्गासाठी स्वतंत्र घरकुल योजना राबविण्याची आवश्यकता, शासनाने यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.संतोष बांगर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"हिंगोली शहरातील जलेश्वर तलाव भागात १९५० पासून १९५ कुटुंब वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांना अनधिकृत अतिक्रमण दाखवून तहसिलदार हिंगोली यांनी दिनांक १३/१२/२०२२ रोजी अतिक्रमण निष्कासित करण्याच्या दृष्टीने काढलेली नोटिस, सदर भूखंड / जागा ही दि.१७/११/२०१८ रोजीच्या शासन आदेशामध्ये रहिवाशी प्रयोजनासाठी नियमानुकुल करणेस बंधनकारक असतांना सदर भूखंड हा नगरपरिषद विकास आराखडयामध्ये बोटक्लब व गार्डनसाठी आरक्षित असल्याचा उल्लेख केलेला असणे, सदरहू १९५ कुटूंब सन १९५० पासून वास्तव्यास असून विकास आराखडा हा सन २०१४ मध्ये तयार केलेला असणे, सदर रहिवाशांना वास्तव्य करित असलेल्या जागेची घरपट्टी, नळपट्टी, वीज जोडणी व इतर आवश्यक सोयी-सुविधा देण्यात आलेल्या असणे, रहिवाश्यांकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजावरुन कांही लोकांचा प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनेत समावेश करण्यात आलेला असणे, सन २०१४ पूर्वीपासून सदर जागा रहिवाशी प्रयोजनाकरिता वापरलेली जात असतांना सन २०१४ मध्ये नव्याने बनविण्यात आलेल्या विकास आराखडयात सदर भूखंडांचे आरक्षण बदलून १९५० पासून वास्तव्य करणाऱ्या रहिवाश्यांना मा.तहसिलदर, हिंगोली यांच्याकडून बेघर करण्याची होत असलेली कार्यवाही, सदर रहिवाशांचे पर्यायी पुनर्वसन शासनाने विशेष बाब म्हणून करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी रहिवाश्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने रहिवाश्यांची विशेष बाब म्हणून पर्यायी पुनर्वसन करण्याबाबत निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."'

(८) **श्री.वैभव नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०२०-२१ मध्ये जिल्हा नियोजन समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषद विभागाला नाविन्यपूर्ण योजनेतून प्राथमिक शाळांना वॉटर फ्युरिफायर पुरविण्याकरीता २ कोटी रुपये मंजूर करणे, जिल्हा नियोजनच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत निधी देतांना परिपूर्ण मागणी

अस्वाक्षरित प्रत

प्रस्ताव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने जिल्हा नियोजन समितीकडे जाणे आवश्यक असणे, तथापी जिल्हा परिषदेने कोणत्याही प्रकारची अधिकृत मागणी केलेली नसतांनाही जिल्हा नियोजनमधून २ कोटी रुपये मंजूर करणे, त्यामुळे यासंदर्भात संशय निर्माण होणे, तसेच वॉटर फ्युरिफायरची किरकोळ बाजारात १४९९९/- रुपये खरेदी किंमत असतांना १९९००/- रुपये प्रमाणे १००५ वॉटर फ्युरिफायर खरेदी करणे, सदर खरेदीमध्ये जवळपास ५० लाख रुपयांपेक्षा जास्त भ्रष्टाचार होणे, सदर प्रकरणी जि.प.सर्वसाधारण सभेत जि.प.सदस्यांनी तक्रारी केल्यानंतर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग यांनी मा.अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करुन चौकशीचे आदेश देणे, सदर चौकशीचा अहवाल दि.०१/११/२०२१ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग यांना सादर करण्यात येणे, सदर अहवालात अनियमितता झाल्याबाबत स्पष्ट नमूद करण्यात येणे, सदर प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग यांनी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्याकडे सादर करणे, परंतू अद्यापही अनियमितता व भ्रष्टाचारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणतीच कारवाई न होणे, याप्रकरणी कार्यवाही करण्यास विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्याकडून जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत असणे, शासनाने याप्रकरणी तात्काळ चौकशी करुन या गैरव्यवहारा जबाबदार असणाऱ्यांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा उपाययोजना.''

(९) **श्री.राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नंदुरबार जिल्हा आदिवासी बहुल असणे, नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती एक जुलै १९९८ साली झाली असणे, मात्र आजही आदिवासी समाजातील मुख्य समस्या कमी झाल्या नसणे, त्यामुळे समाजातील दारिद्र्य, बेरोजगारी, कुपोषण यासारख्या समस्या ऐरणीवर येणे, पर्यायाने रोजगारासाठी जिल्ह्यातील आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात परराज्यात स्थलांतरीत होत असणे, जिल्ह्यातील सहाही तालुक्यात साधारणत: ऑक्टोबर महिन्यापासून सुमारे जिल्ह्यातील ६०% आदिवासी कुटुंब व जिल्ह्यातील एकूण गावापैकी ५३% गावांमधून आदिवासी कुटुंब रोजगाराच्या शोधात हंगामी स्थलांतर होत असणे, स्थलांतरामुळे कुटुंबांने पोषण, व्यसनधीनता मुला बाळांच्या संगोपनाकडे, शिक्षणाकडे, आरोग्याकडे दुर्लक्ष होत असणे, जिल्हा निर्मित झाल्यापासून शासनाची उदासीनता व ठोस उपाययोजना दिसून न येणे, जिल्हाच्या समस्यांच्या निवारणासाठी शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित

(१०) **सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व सदस्यांनी कोटयावधी रूपयाचा बेकायदेशीर आर्थिक व्यवहार व अनधिकृत व्यावसायिक गाळयांचे बांधकाम करून शेतक-यांची व शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, उक्त कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात स्थानिक प्राधिकरणाची परवानगी न घेता उपलब्ध अभिक्षेत्र निर्देशांक (Floor Space Index) पेक्षा अधिक अतिरिक्त व्यावसायिक गाळयांचे बांधकाम केले असणे, उक्त अतिरिक्त व्यावसायिक गाळा बाजार समितीच्या संबंधीत नसलेल्या व्यक्तींना अधिक भावाने वितरीत केलेले असणे, सदर अतिरिक्त व्यावसायिक गाळयांच्या बांधकामामुळे भाजीपाला व तरकारी उत्पादक शेतक-यांना आपल्या मालाच्या गाडया पार्क करणे व दळणवळण करण्यासाठी त्रासदायक ठरत असणे, उक्त कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यवस्थापनाने बाजार समितीचा निधी नियमबाहय व बेकायदेशीररित्या आपल्या मर्जिच्या बुडीत कर्नाळा नागरी सहकारी बँकेमध्ये कोटयावधी रूपयाची गुंतवणूक केली असणे, कर्नाळा बँकेतील करोडो रूपयाच्या नियमबाहय व बेकायदेशीर गुंतवणूकीमुळे नागरिकांचे व शेतक-यांचे मोठयाप्रमाणात नुकसान झाले असणे, नागरिकांमध्ये व शेतक-यांमध्ये पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व सदस्यांबद्दल कमालीचा असंतोष निर्माण झाला असणे, त्यामुळे पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती, समिती सदस्य व अधिका-यांच्या बेकायदेशीर कारभाराची तातडीने चौकशी करण्यासाठी सक्षम अधिका-याची नेमणूक करण्याबाबत शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्रीमती गिता जैन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मे. जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना मेट्रो लाईन नं. ९ भाईंदर ते दहिसर पर्यंतचा मेट्रो प्रकल्प राबवत असणे, सदर प्रकल्पात मे. जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या मार्फत अनेक सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असणे, सदर सुरक्षा रक्षकांकडून फॅक्टरी ॲक्ट १९४८ अन्वये आठवड्याची एक दिवस सुट्टी न देणे तसेच त्यांच्याकडून आठवड्याचे ४८ तासापेक्षा अधिक तास काम करून घेण्यात येणे. ठाणे जिल्ह्यांकरिता सुरक्षा रक्षकांकरिता किमान वेतन कायद्यानुसार त्यांना १३,१७४ रुपये वेतन देणे कायद्याने बंधनकारक असतानाही मे.जे.कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. सदरच्या कंपन्याकडून ११,००० रुपयात सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात येणे, सदर प्रकरणी संबंधीत विभागाने जातीने

अग्रिम प्रत

लक्ष घालून मे. जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. व त्यांना सुरक्षा रक्षक पुरविणारे कंपन्या ह्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कामगार आयुक्त, ठाणे जि. आणि अध्यक्ष / सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जि., तसेच मा. आयुक्त, मुंबई महानगर विकास प्रदेश प्राधिकरण यांच्याकडे पत्रव्यवहार करून हि संबंधीत विभागांचे हेतुपुरस्सर सदर बाबतीत होणारे अक्षम दुर्लक्ष यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

अमुद्रित प्रत

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**आदिवासी विकास मंत्री** : "कर्जत व पेण (जि. रायगड) तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळांच्या समस्यांबाबत" या विषयावरील श्री. सुरेश लाड व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ९७६१७ च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**मुख्यमंत्री** : सन २०२१ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ४७ च्या अनुषंगाने माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा.**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : औचित्याचे मुद्दे.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरीचिंचवड शहराची लोकसंख्या साधारणपणे २८ लाखांपेक्षा जास्त असून शहरातील हिंजवडी भागात आयटी कंपनीचा वाढलेला विस्तार तसेच चाकण, भोसरी औद्योगिक विकास क्षेत्रात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, यामुळे देशातील सर्व भागातून स्थलांतरीत नागरिकाचे शहरात राहण्याचे प्रमाण वाढलेले असणे, परिणामी बांधकाम व्यवसायकांनी निर्माण केलेल्या रहिवाशी सदनिकामधे मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ, परिणामी स्थानिक महापालिका प्रशासनकडून रहिवाशी सोसायटींना मूलभूतसोयी सुविधा देणेबाबत होत असलेली अक्षम्य अशी दिरंगाई, या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड शहरातील हजारो रहिवाशी सोसायटीधारकांना मूलभूत सोयी-सुविधा त्वरित उपलब्ध करून देणेबाबत राज्य शासनाने महापालिका प्रशासनाला योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता व करावयाची उपाययोजना."

(२) **श्री.सुनिल टिंगरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरात वाहतूक सुधारणा दर्जेदार होणे करिता केंद्र, राज्य, मनपा संयुक्त सहभागाने बी आर टी योजना सुरू झाली असणे सदर योजनेत अनेक बदल करूनही वारंवार सुधारणा करूनही वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणे ऐवजी बिकट झालेला असणे, पुणे नगर रोड येथील बीआरटी प्रकल्प डिझाइन पूर्णतः सदोष झालेला असणे जेणेकरून सदर क्षेत्र अपघात प्रवीण व असुरक्षित होणे कारणाने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तीय हानी मोठ्या प्रमाणावर होणे तसेच निधी अनुदान प्राप्त करणेस वाहतूक सुधारणा ऐवजी प्राधान्य दिले असल्याचे निर्देशही होणे, नगर रस्ता हा बीआरटी योजनेत सक्षमतेस योग्य असल्याची खातरजमा न करता योजना कार्यान्वित केली असल्याने वाहतूक कोंडी, प्रदूषण, वेळेचा अपव्यय, श्वसन विकार, लहान मोठे अपघातातून जीवित व वित्तीय हानी होणे व उद्योजक व्यवसाय अन्यत्र हलवण्यास सुरू करणेस सुरवात झाली

अग्रिम प्रत

असणे, बीआरटी मार्गातून खाजगी वाहने जाण्यास प्रतिबंध करणेस वॉर्डन नेमणे व कॅरेज विड्थ मधील अतिक्रमण काढणे ही कामे मनपाने न केल्याने मोठे अपघात वारंवार होणे नगररस्ता वाहतुकीस असुरक्षित असणे हे केंद्र शासनाच्या सुरक्षा ऑडिट मध्ये नमूद होणे, पुणे मनपा व वाहतूक पोलीस विभाग यांच्यात कोणताही समन्वय नसणे, याबाबी मुळे बी आर टी प्रकल्प रद्द करावा अशी प्रबळ लोकभावना व नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

(३) **प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील धारावी ही मोठी झोपडपट्टी असलेली वस्ती असून येथे विविध जाती, धर्माचे लोक राहत असणे, याठिकाणी लघु व मध्यम उद्योगधंदे असल्यामुळे धारावीची एक वेगळी ओळख असणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प निविदा जाहिर होणे, त्याविरोधामध्ये मा. उच्च न्यायालयात मागील निविदा लागलेले लोक कोर्टात जाणे, पात्र/अपात्रतेविषयी निर्माण होत असलेला संभ्रम, मोठया प्रमाणात उठलेले अफवाचे जाळे, सदरील पुनर्विकास बाहेर होणार की त्याचठिकाणी याविषयी भिती निर्माण होणे, धर्मस्थळांबद्दल माहिती नसणे, तसेच येथील उद्योग (लघु/मध्यम) यांचे पुनर्वसन कसे होणार याबद्दल निर्माण झालेली साशंकता, मोठया वसाहतीत असलेले बालिका नगर, शाहू नगर यामध्ये निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, याबाबत मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिलेले असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील स्थानिकांत निर्माण झालेले चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने लक्ष घालून पुनर्विकासात पारदर्शकता आणण्यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाच्या २९ प्रमुख विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या अंदाजे एकूण २ लाख १९३ जागा रिक्त असून त्यात तब्बल ४६ हजार ९६२ जागा जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांमुळे तेथील नागरिकांना शासकीय सेवा मिळत नसणे, राज्य शासनाच्या सर्वच विभागांमध्ये मोठया प्रमाणात रिक्त असलेल्या पदांमुळे शासकिय कामकाज करण्यामध्ये मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होणे, राज्यात गेल्या ५ ते ७ वर्षापासून स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदभरती नसल्यामुळे शासन विरोधी असंतोषामध्ये वाढ होणे, या करीता राज्य शासनाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सर्व शासकिय विभागातील रिक्त पदे भरती करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येऊन पहिल्या टप्यामध्ये ७५ हजार पदे भरण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात येणे, सदरील भरती प्रक्रिया राबविण्यासाठी सामान्य

प्रशासन विभागाच्या दि.२१ नोव्हे. २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये TCS आणि IBPS या दोन कंपन्यांची निवड करण्याचा निर्णय घेण्यात येणे, तसेच रिक्त पदांची पदभरती वेळेत करण्याकरती अन्य पात्र कंपन्यांची निवड करण्याकरीता शासनाने योग्य पदध्तीने नियोजन करणे गरजेचे असणे, परंतू पदभरती प्रक्रिया करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या TCS आणि IBPS या दोन कंपन्यां दुर्गम /अतिदुर्गम भागामध्ये सदर प्रक्रिया राबवितांना उपलब्ध मनुष्यबळ / यंत्रसामुग्री / किंवा यंत्रणा याबाबत कोणतेही नियोजन दोन्ही कंपन्यांकडे नसणे, तसेच पदभरती होण्यास विलंब होण्याची शक्यता मोठया प्रमाणात असणे, तसेच पदभरती वेळेत होत नसल्याने विद्यार्थ्यांचे वय वाढत असून विद्यार्थी भरती प्रकियेपासून वंचित राहण्याची भिती विद्यार्थ्यांना भेडसावणे, त्यामुळे शासनाचे दि. १५ ऑगस्ट २०२३ पर्यत भरती प्रक्रिया पुर्ण करण्याचे उदिष्ट सफल होण्याची शक्यता कमी असणे, या करीता अन्य पात्र कंपन्यांची पदभरतीकरीता निवड करण्याकरीता शासनाने कार्यवाही करणे गरजेजे असुन ७५ हजार रिक्त पदांची भरती विहित वेळेमध्ये करुन विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील गोरेगांव पूर्व आरे कॉलनीमधील २७ आदिवासी पाडयांमध्ये सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास येणे, सदर आरे कॉलनीतील  अंतर्गत रस्त्याची झालेली अत्यंत दयनीय अवस्था,तसेच येथील स्थानिक रहिवाशी बांधवाना दयनीय रस्त्यांवरुन वाहतूक करण्यात येत असलेल्या अनेक अडचणी,त्यामुळे मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, वृध्द, लहान मुले, गरोदर महिला आदिंना गैरसोयीला करावा लागत असलेला सामना, सदरहू रस्ते आरे दुग्ध्यविकास विभागाच्या अखत्यारित येत असून या रस्त्याच्या दुरुस्तीकरिता अदयापी निधी उपलब्ध न होणे, आरेतील व आदिवासी पाडयांतील सिमेंट/डांबरी रस्त्याकरिता  प्रस्ताव तयार असून अंतिम मंजूरीकरिता प्रलंबित असणे, तसेच या आदिवासी बांधवाचे त्याचठिकाणी पुनर्वसन करण्याबाबत होत असलेली मागणी, याकरिता सातत्याने शासनाकडे केलेला पाठपुरावा, परंतु शासनाकडून होत असलेली चालढकल, आदिवासी बांधवाचे जीवनमान उंचविण्याकरिता त्यांच्या आदिवासी बांधवाचा विकास करणे गरजेचे असल्याने त्याकरिता भरीव निधी उपलब्ध करुन देऊन एकाच ठिकाणी त्यांच्या उपजिविकेसहित त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत तसेच आदिवासींच्या व्यतिरिक्त आरेमध्ये १० हजार गरीब कुटुंब राहत असून त्यांनादेखील परिपूर्ण सोयीसुविधा मिळत नाही याकरिता त्यांचे एसआरए च्या धर्तीवर पुनर्वसन करण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, त्याचबरोबर जोगेश्वरी मधील प्रतापनगर, मजासगांव टेकडी, दत्तटेकडी, शिवटेकडी ते दुर्गानगरयेथील झोपडयांचा

अस्वाक्षरित प्रत

पुनर्विकास एनडी झोनमुळे रखडलेला असणे, या भागात असलेल्या गगनचुंबी इमारतीना ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध होणे, परंतु प्रतापनगर, शिवटेकडी ते दुर्गानगर येथील इमारतींना ना हरकत प्रमाणपत्र देतांना अनेक निकषाचा बडगा दाखविण्यात येणे, एकाच भागात परवानगी देतांना दुजाभाव शासनाकडून केला जाणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,येथील स्थानिक रहिवाश्यांकडून पुनर्वसनाची होत असलेली मागणी, परिणामी आदिवासी तसेच स्थानिक रहिवाशी बांधवामध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाप्रती निर्माण झालेली तीव्र संतापाची भावना, शासनाने आदिवासीच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष घालून रस्ते व पुनर्वसन करण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(६) **श्री.सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड (शिवाजीनगर, पुणे) यांना पुणे मनपा कडून यापूर्वी जकात कर मिळत असणे, परंतु तो मार्च २०१३ मध्ये बंद केल्यामुळे खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा उत्पन्नाचा स्त्रोत बंद होणे, तसेच खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाने वाहनांसाठी एन्ट्री फी सुरु करणे, परंतु ती सुध्दा केंद्र सरकारने बंद करणे, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाला एप्रिल २०१३ पासून LBT सुध्दा लागू असणे परंतु त्यामध्ये सुध्दा बोर्डाला तोटा सहन करावा लागणे व LBT सुध्दा बंद करून २०१७ मध्ये LBT चा GST मध्ये समाविष्ट करण्यात येणे, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाला महाराष्ट्र शासनाचा GST चा हिस्सा मिळत नसणे, यामुळे येथील विकास कामांना केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्याकडून कोणताही निधी उपलब्ध न होणे, यामुळे खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा विकास न होणे, विकासाअभावी तेथील नागरिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान होणे, तेथील स्थानिक नागरिकांना राज्य शासन व महानगरपालिका यांच्या कोणत्याही सुविधा लागू न होणे, पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका या दोन्ही महापालिकांच्यामध्ये खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड वसलेले असणे, दोन्ही बाजूने शहरे वाढत चाललेली असणे, यामुळे सर्व वाहतुकीचा भार तेथील रस्त्यांवर येत असून रस्ता रुंदीकरण न झाल्यामुळे येथील रस्त्यांवर नेहमी वाहतूक कोंडी होत असणे, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपुलांची गरज असून सुध्दा निधी अभावी ते होत नसणे, तसेच खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डातील परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याच्या लाईन ६० वर्षांपूर्वीच्या जुन्या असणे, त्या सुध्दा बदलण्यात आलेल्या नसणे, यामुळे नागरिकांना अशुध्द पाणीपुरवठा होत असणे, तसेच रस्ता, ड्रेनेज, वीज, पाणीपुरवठा, दवाखाने अशा सुविधा व्यवस्थित मिळत नसणे, नागरिक त्रस्त असून नागरिकांची अवस्था दयनीय झालेली असणे, अशी परिस्थिती महाराष्ट्रातील ७ ही कॅन्टोन्मेंट बोर्डांची असणे, GST भरपाई कायदा २०१७ (GST Compensation Act, 2017) मध्ये महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांचा समावेश करण्यात येणे, परंतु महराष्ट्रातील ७ कॅन्टोन्मेंट बोर्डांना

अप्रकाशित प्रत

यातून वगळण्यात आले असणे, परंतु दिल्ली, मध्य प्रदेश, तेलंगना, झारखंड, पंजाब, कर्नाटक ही राज्ये त्यांच्या राज्यातील कॅन्टोन्मेंट बोर्डांना GST ची भरपाई देत असणे, महाराष्ट्रातील ७ कॅन्टोन्मेंट बोर्डांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, तसेच महाराष्ट्रातील ७ कॅन्टोन्मेंट बोर्डांना GST भरपाई कायदा २०१७ (GST Compensation Act, 2017) मध्ये सहभागी करण्याची होत असलेली मागणी, तसेच दरवर्षी महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्रातील ७ कॅन्टोन्मेंट बोर्डांना मोठ्या प्रमाणात निधी देण्याची गरज, त्यादृष्टीने शासनाने गांभीर्याने व तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिक्षेत्रात नगरनियोजनाकरिता शासनाने सिडको अंतर्गत नैना प्राधिकरणाची स्थापना केली असणे, जवळपास आठ वर्षाचा कालावधी होऊनसुध्दा नैना प्राधिकरणाने गावठाण अंतर्गत कुठल्याही प्रकारे गावांचा विकास केला नसणे, नैना अंतर्गत येणा-या अनेक ग्रामपंचायत हद्दीतील जवळपास शेकडो इमारती मोडकळीस आल्यामुळे राहण्यासाठी धोकादायक झाल्या असणे, नैनाच्या संवेदनहीन कारभारामुळे निरनिराळ्या इमारतींचा पुर्नविकास रखडला असणे, इमारतींच्या पुर्नविकासाअभावी गेल्या वर्षभरात इमारतींचे स्लॅब कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असणे, डिसेंबर २०२२ मध्ये नैना क्षेत्रातील सुकापूर ग्रामपंचायत हद्दीतील मोडकळीस आलेल्या इमारतीतील स्लॅब कोसळून १२ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला असणे, नैना प्राधिकरणाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात सिडकोने अद्यापपर्यंत कोणताच धोरणात्मक निर्णय घेतलेला नसणे, पुनर्बांधणी अभावी धोकादायक इमारतींमध्ये आपला जीव मुठीत घेऊन रहावे लागत असल्यामुळे नागरिकांच्या मनात प्रचंड भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, त्यामुळे शासनाने नैना परिक्षेत्रातील ग्रामपंचायत हद्दीतील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री.रणधीर सावरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अकोला (शिवणी) येथील विमानतळ विस्तारीकरणाचे काम  गेल्या अनेक वर्षांपासून केवळ जमीन भूसंपादन अभावी रखडलेले असणे, विमानतळ विस्तारीकरणाचे काम त्वरित करावे या करिता लोकांची व लोक प्रतिनिधींची सतत व दीर्घकालीन मागणी असणे, हवाई वाहतुकी अभावी पश्चिम विदर्भातील औद्योगिक व आर्थिक विकास खुंटणे,

अग्रिम प्रत

पश्चिम विदर्भाचा विकास साधण्याचे दृष्टीने अकोला विमानतळाची स्थापना सन १९४३ साली होणे राज्यातील तत्कालीन २० विमानतळापैकी एक अकोला विमानतळ असणे, विमानतळाची धावपट्टी विस्तारित करण्यासाठी आवश्यक ६०.६८ हे. जमीन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला यांचे कडून हस्तांतरित झालेली असणे, तथापि आवश्यक २०.२४ हेक्टर खाजगी जमीन अद्याप संपादित न झाल्याने विमानतळ विस्तारीकरणाचे काम रखडणे, खाजगी जमीन संपादनासाठी आवश्यक निधी मागणी प्रस्ताव शासन मंजुरीच्या प्रतीक्षेत असणे, याबाबत सन २०२२ च्या विधानसभा दुसरे अधिवेशन (पावसाळी) मध्ये चर्चा घडून येणे, खाजगी जमीन संपादनासाठी मागणी केलेला निधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी शासनाच्या वतीने सभागृहात घोषणा करणे, सदर लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात अकोला विमानतळाकरिता पूर्वी मागणी केल्याप्रमाणे वित्तीय तरतूद करावी अशा आशयाचे पत्र महाव्यवस्थापक, भारतीय विमान प्राधिकरण यांनी शासनास कळविण्यात आल्याचे तसेच सदर प्रस्तावास मा. मुख्यमंत्री महोदयांची मान्यता प्राप्त आहे असे स्पष्ट करण्यात आलेले असणे, निधी अभावी राज्य शासनाकडून खाजगी जमीन अधिग्रहण करण्यात होत असलेली चाल ढकल, तसेच सदर विमानतळ विस्तारीकरणाचे काम तातडीने सुरु होत नसल्याने पश्चिम विदर्भातील अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वशिम, हिंगोली या पाच जिल्हयांचा विकास खुंटीत झाला असल्याची नागरिकांची भावना निर्माण होणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री. रोहित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अहमदनगर जिल्ह्यातील मौजे कुसडगाव तालुका जामखेड येथे राज्य राखीव पोलीस बल गटाचे पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास तत्कालीन शासनाने मान्यता देऊन दिनांक २६ जून, २०२० रोजी त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला असणे, सदर पोलीस प्रशिक्षण बांधकामाचे कार्यारंभ आदेश देऊन काम सुरू करण्यात येणे, तथापि सदरचे राज्य राखीव बलाचे प्रशिक्षण केंद्र कुसडगाव ऐवजी वरणगाव जिल्हा जळगाव येथे स्थलांतरित करण्याची जळगाव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मागणी पुढे करून विद्यमान उपमुख्यमंत्री महोदयांनी कामाची सद्यस्थितीत निधी वितरणाची व तत्सम बाबी विषयी माहिती मागविली असणे, परंतु मौजे कुसडगाव येथील प्रशिक्षण केंद्राचे ३० ते ४० टक्के काम पूर्ण झालेले असताना ते प्रशिक्षण केंद्र वरणगाव येथे स्थलांतरित करण्याची मागणी तांत्रिकदृष्ट्या समर्थनीय नसणे, परिणामी, कर्जत जामखेड तालुक्यासह जिल्ह्यातील जनतेत व स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले प्रचंड असंतोषाचे व नाराजीचे वातावरण, सदर प्रशिक्षण केंद्र पुर्वी मंजुर झालेल्या ठिकाणीच मौजे कुसडगांव येथे होण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच कर्जत जामखेड जिल्ह्यातील स्थानिक

अग्रिम प्रत

नागरीकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री.संजय सावकारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन १९९५-९६ च्या दरम्यान हातनूर, ता.भुसावळ येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र मंजूर करण्यात येणे, तत्कालीन गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री यांचे हस्ते सदर प्रकल्पाचे भुमीपुजन करणे, त्यानंतर मात्र काहीही कार्यवाही न होणे, कालांतराने २०१९ ला पोलीस प्रशिक्षण केंद्र ऐवजी तात्कालीन मुख्यमंत्रानी राज्य राखीव दलाचे प्रशिक्षण केंद्र घोषित करणे, गृहविभाग, शासन निर्णय क्र.APO ३६१५/प्र.क्र.१२२/पोल-३, दि.१३.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयांन्वे मौजे कोर्टी मोक्ता, ता बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथे भारत राखीव बटालयिन क्र. ४ व मौजे शिसा उदेगाव व हिंगणा शविार, ता.अकोला, जि.अकोला येथे भारत राखीव बटालयिन क्र.५ तसेच पोलीस प्रशक्षिण केंद्र, हातनूर वरणगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव येथे राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१९ स्थापना करण्यास मान्यता देण्यात येणे, सदर केंद्रसाठी रु १०० कोटीचा निधी मंजूर करून पदनिर्मिती देखील करण्यात येणे, प्रशक्षिण केंद्र व पद निर्मितीबाबत सर्व शासकीय परवानग्या घेऊन मा.तत्कालीन राज्यपाल महोदयांच्या परवानगीने शासकीय परिपत्रक काढण्यात येणे सरकार बदलल्यानंतर केवळ एका सदस्यांच्या पत्राने कोणतीही प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण न करता तसेच कोणतेही वैध कारण न देता सदर प्रशक्षिण केंद्र वरणगाव, भुसावळ येथून रद्द करून कुसडगाव, जि.अहमदनगर येथे निर्माण करण्यात मान्यता देण्यात येणे, हा खांदेश तथा विशेषत: जळगांव जिल्ह्यावर झालेला अन्याय, परिणामी खान्देशातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, राज्य राखीव पोलीस बल गट क्र १९ पुनश्च वरणगाव येथे स्थापित करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबईतील बेलापूर विधानसभा क्षेत्रातील पोलिसांची घरे ही अतिशय जीर्ण झाली असून मोडकळीस आलेली असणे, सदर घरांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून सदर ठिकाणी रहिवास करणारे पोलिसांचे कुटुंब हे जीव मुठीत घेऊन राहत असल्याने तेथे जीवितहानी होण्याची शक्यता, सदरबाबत मी अनेक वेळा विधानसभेत प्रश्न उपस्थित केला असून तत्कालीन गृह राज्यमंत्री यांजसह अनेक बैठकाही घेतल्या गेल्या असणे, सदर घरांचा पुनर्विकास करणेसंदर्भात राज्य शासनाने सिडको प्रशासनास

निर्देश दिलेले असणे, सिडको प्रशासनाने पोलीस विभागास भरणा करण्यात येणाऱ्या रकमेची पॅनल्टी माफ केली असून पुनर्बांधणीबाबत पुढील कोणतीही कार्यवाही न होणे, राज्य शासनाकडून वारंवार होणारे अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पोलिसांच्या कुटुंबामध्येही निर्माण होणारी असंतोषाची भावना व नाराजीचा सूर, अर्धे-अधिक पोलीस कर्मचारी घरांपासून वंचित असल्याने पोलिसांच्या घरांना वाढीव एफएसआय देऊन पुर्नविकास करण्याची गरज, जेणेकरून जास्तीत जास्त पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना घरांची होणारी उपलब्धता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **डॉ.राहूल आहेर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नार-पार-औरंगा व अंबिका या चार पश्चिम वाहिनी नदया पश्चिमीकडे वाहत जावून अरबी समुद्रात मिळणे, या पश्चिम वाहिनी नदयांच्या खोऱ्यालगत पुर्वेस गिरणा खोरे असुन सदर क्षेत्रातील पाणी उपलब्धता कमी असुन हे खोरे तुटीचे खोरे असणे, या खोऱ्यातील पाण्याची गरज लक्षात घेता पश्चिमी वाहिनी नदी खोऱ्यातील पाणी वळण योजनेद्वारे गिरणा नदी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन असणे, या योजनेतुन वळविण्यात आलेल्या पाण्यामुळे नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, कळवण, देवळा, सटाणा, मालेगांव, नांदगाव, चांदवड तालुक्यातील गावांना व जळगाव जिल्हयातील चाळिसगाव, भडगांव, पारोळा व पाचोरा या तालुक्यातील गावांना सिंचनाचा लाभ होणार असणे, तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असणे, त्यामुळे स्थानिक जनतेच्या व शेतकऱ्यांच्या विकास व हितासाठी सदर प्रकल्प होणे आवश्यक असणे, म्हणून स्थानिक नागरिकांकडून नार-पार-गिरणा नदी जोड योजना होणेबाबत वारंवार पाठपुरावा केला जात असणे, नार-पार-गिरणा नदी जोड योजनेस शासनाने तात्काळ प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजन."

(१३) **श्री.समाधान आवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“माहे डिसेंबर च्या दुसऱ्या आठवड्यात व त्या सुमारास सोलापूर जिल्ह्यातील विशेषता पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील पाणथळ व क्षारपड जमिनीचे प्रश्न ऐरणीवर येणे, पाणथळ व क्षारपड जमिनीची क्षेत्र हे लाभ क्षेत्रातील विहिरींच्या पाणीपातळीच्या नियतकालिक निरीक्षणाद्वारे ठरविले जाणे त्यासाठी पावसाळ्यात (१५ ऑक्टोबर ते ३१ जानेवारी) व पावसाळ्यापूर्वी (१ एप्रिल ते ३१ मे) अशा दोन हंगामात दर वर्षी नियतकालिक निरीक्षणे घेण्यात येणे, नुकत्याच झालेल्या निरीक्षणानुसार सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील क्षारपड जमिनीं मध्ये मोठ्या प्रमाणावर

अग्रिम प्रत

वाढ होणे, पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील १००० हेक्टरपेक्षा जास्त जमिनी या क्षारपड होणे, जमिनी पाणथळ व क्षारपड होण्याची मुख्य कारणे म्हणजे कालव्याद्वारे सिंचन होणाऱ्या पाण्याचा निचरा न होणे, पावसाच्या पाण्याचा मंदगतीने होणारा निचरा, रासायनिक खतांचा अति प्रमाणात वापर आणि सर्वात महत्वाचे कारण म्हणजे जिल्ह्यातून वाहत असणाऱ्या भीमा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होऊन पाणी दूषित होऊन क्षारता वाढणे अशी असणे, जमिनी क्षारपड झाल्यामुळे शेती उत्पादनामध्ये घट होऊन पीक उत्पादन कमी होणे, जमिनीचा पोत खराब होऊन पीक हंगामात घट होणे, तसेच शेतीतून शेत मजुरांचे विस्थापन होणे, कृषी उत्पादनात घट होणे व मुख्यतः शेती व शेतीपूरक व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे अशीच परिस्थिती राहिल्यास नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणावर जमिनी क्षारपड होऊन शेत जमिनी नष्ट होण्याची भीती निर्माण होणे, याचा एकूण परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होऊन त्यांच्या एकूण राहणीमानावर होणे, याच्यावर उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर अशी भूमिगत चर योजना राबविण्याची मागणी शेतकऱ्यां मार्फत जोर धरू लागणे, सदरची योजना ही अत्यन्त प्रभावी असून दीर्घकाळ परिणाम करणारी असणे, शासनाने सांगली जिल्ह्यात सदरच्या भूमिगत चर योजना ही प्रायोगिक ततत्वावर राबविली जात असणे, तीच योजना सोलापूर जिल्ह्यात देखील राबविण्याची आवश्यकता असणे, आगोदरच राज्यातला बळीराजा त्रासलेला असताना ह्या क्षारपड जमिनींचे भविष्यात मोठे संकट उभे राहून अल्प भूधारक शेतकरी भूमिहीन होण्याची भीती निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१४) **सर्वश्री. प्रकाश सोळंके, बाळासाहेब आजबे, संदिप क्षिरसागर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०२२-२३ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र शासना मार्फत एल.एल.बी (३ वर्ष) तथा एल.एल.बी. (५ वर्ष) अभ्यासक्रमासाठी प्रवेश परिक्षाची सूचना दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी प्रसिध्द होणे, इच्छुक उमेदवाराकडुन दिनांक १९ मार्च, २०२२ ते २२ जून, २०२२ इतका प्रचंड कालावधी देणे, ऑगस्ट – २०२२ च्या पहिल्या आठवडयामध्ये परिक्षा घेणे, ऑक्टोंबर २०२२ ते डिसेंबर २०२२ पर्यंत प्रवेश प्रक्रिया पुर्ण होणे, मार्च - २०२२ मध्ये सुरु झालेली प्रक्रिया डिसेंबर - २०२२ मध्ये पुर्ण होणे, प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी ९ ते १० महिन्याचा कालावधी लागणे, एकंदरीत प्रवेश प्रक्रियेसाठी प्रचंड दिरंगाई होणे, बार काऊन्सिल ऑफ इंडिया व विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार जुलै महिन्यात नवे सत्र सुरु होणे, अपेक्षीत असणे, राज्य शासनाच्या दिरंगाईमुळे विद्यार्थी व महाविद्यालयावर झालेला विपरीत परिणाम, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

अप्रकाशित

(१५) **श्री.सदा सरवणकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास या मंदिरामध्ये लाखो भक्तगण दर्शनासाठी येणे, मंदिराला स्वेच्छेने दानपेटीत दान टाकणे,या दानाच्या पैशाचा योग्य तो विनियोग न करणे, कोरोना काळात शासनाने भोजन थाळी चालू करण्यासाठी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी न करणे, उलट नियमात कोणतीही तरतूद नसताना विश्वस्त मंडळाने बेकायदेशीर ठराव मंजूर करणे, नियमात तरतूद नसताना शासनाला पाच कोटी रुपयांची देणगी देणे, आगाऊ कर हा संस्थेला माफ असणे, त्यानुसार शिर्डी साई संस्थानला आगाऊ कर माफ होणे, आगाऊ कर न भरण्याची सूट असतानाही शासनाला एक कोटी चाळीस लाख रुपयांचा आगाऊ कर भरणे, कोरोना काळात परराज्यातून १६,४०० लिटर तूप मागविणे, राज्यातील तूप विक्रेतांना डावलणे, सदर तूप वापराविना पडून राहणे, काही तूप फेकून देणे, उर्वरित तुपाची नियमात तरतूद नसताना निविदा मागवून विक्री करणे, मंदिराच्या नूतनीकरणासाठी निविदा मागविणे, कालावधी १८ महिन्याचा ठरवून देणे, सदर कालावधीत नुतनीकरणाचे काम पूर्ण न झाल्यास प्रतिदिन दहा हजार रुपये दंड असा नियम असणे, त्या नियमाची पूर्तता न करणे,ठरलेल्या कालावधी पेक्षा सात महिन्याचा कालावधी लोटूनही ठेकेदाराकडून २१ लाख रुपयांचा भुर्दंड न घेणे, यात न्यासाचे आर्थिक नुकसान होणे, कोरोनाच्या काळात सोशल डिस्टनसिंगसाठी भाविकांना दर्शन घेण्यासाठी Q R code साठी निविदा न काढणे, जे काम ६० ते ७० लाखाचे असणे, ते काम परस्पर एका कंपनीला ३.५० कोटी रुपयांना देणे, अशा प्रकारच्या बेकायदेशीर व्यवहारांमध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार होणे,याबाबत शासनाकडे तक्रार करूनही त्याची दखल न घेणे,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(१६) **श्री.महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोरेगांव विधानसभा मतदार संघातील श्री शिवाजी शिक्षण संस्था व शिवाजी विद्यालय डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा ही शाळा गावातीलच काही गुंडाकडून बळजबरीने बळकविण्यात आली असून शिक्षण विभागातील अधिका-यांच्या संगनमताने प्रचंड अनागोंदी व गैरकारभार सुरु असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, सदरहू गावगुंड शाळेचे सभासद नसतांनाही वयस्कर सभासदांकडून ही शाळा आपल्या ताब्यात घेऊन सन २०१५ पासून आजतागायत म्हणजे सन २०२२ पर्यंत तीन शिक्षकांची नेमणूक दाखवून शासनाकडून पगार उचलण्यात येणे, तसेच सदर शिक्षकांची आवश्यकता नसतांना त्यांची नेमणूक दाखवून प्रत्यक्षात काम न

अग्रिम प्रत

करता सदरील पगार उचलण्यात येणे, साधारणपणे सुमारे दीड ते दोन कोटी रुपयांची शासनाची फसवणूक करणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु अद्यापपर्यंत या गावगुंडावर कोणतीच कारवाई न होणे, परिणामी ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सदरहू शाळा गावगुंडाकडून सोडवून घेण्याची तसेच त्यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, त्याचबरोबर शाळेचे आर्थिक नुकसान तातडीने भरुन देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(१७) **सर्वश्री.अतुल भातखळकर, छगन भुजबळ, अजित पवार, धनंजय मुंडे, दिलीप वळसे-पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अमित देशमुख, बाळासाहेब थोरात, कुणाल पाटील, नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. धिरज देशमुख, झीशान सिद्दिकी, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरातील हवेचा दर्जा हा अतिवाईट असल्याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व सफर यांनी नोंद केल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे हवेच्या गुणवत्तेचा दर्जा खालावत असणे, तसेच, वाढत्या हवा प्रदूषणामुळे त्याचा आरोग्यावर मोठा परिणाम होत असणे, त्यामुळे, शहरातील हवेची ढासळती गुणवत्ता, वाढते प्रदूषण याचा अभ्यास करून उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, महत्वाच्या वाहतुकीच्या ठिकाणी हवा शुद्धीकरण यंत्र (एअर प्युरीफायर) बसवण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(१८) **सर्वश्री. संदिप क्षिरसागर, प्रकाश सोळंके, बाळासाहेब आजबे, अतुल बेनके, सुनिल भुसारा, निलेश लंके, सुनिल शेळके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बीड जिल्हयातील आदर्श शिक्षण संस्था, बीड, नवगण शिक्षण संस्था, नवगण राजुरी व विनायक युवक कल्याण संस्था, तसेंच अनंत कृषी प्रतिष्ठान या शिक्षण संस्था कार्यरत असणे, तथापि संस्थांच्या कार्यक्षेत्रनिहाय झालेला विस्तार, सदरील शैक्षणिक संस्थेमध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या शाळांना शासनाने शाळानिहाय दिलेली मंजुरी तसेच त्यातील अनुदानित व विनाअनुदानित प्रकार, सर्व शाळांतील सर्व संवर्गातील मंजूर पटसंख्या व कार्यरत मनुष्यबळ याबाबतची माहिती उघड करण्यांत न

अग्रिम प्रत

येणे, त्यातील सर्व शाळांमध्ये कामकाजाकरितां लिपिक ते मुख्याध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य यांची निवड, शासन संच मान्यता, किंवा संच मान्यतेनुसार उमेदवारांची निवड, बिंदू नामावलीनुसार संस्थेतील सर्व पात्र- अपात्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती, संस्थेतील कर्मचारी रिक्त जागा याबाबत देखील माहिती उघड करण्यांत न येणे, त्याचप्रमाणे संस्थेला शासनाकडून लेखाशिर्षनिहाय मिळालेले विविध प्रकारचे अनुदान व करण्यांत आलेला विनियोग नियमानुसार न करता मनमानी पध्दतीने करण्यांत आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, तसेंच संस्थेकडे सर्व शाळांशी निगडीत असलेली मालमत्ता, भाडेतत्वावर घेतलेल्या जागा अथवा हस्तांतरीत शासकीय तसेंच शालेय पोषण आहार अंतर्गत संस्थेच्या सर्व शाळांना वर्गनिहाय शासन निकषानुसार करण्यांत आलेला साहित्य व अन्न पुरवठा व नियमबाह्यरित्या त्यांचे केलेले वितरण, त्याबाबत करण्यांत आलेले वर्षनिहाय परिक्षण, वर्गनिहाय तुकडी मान्यता घेत असतांना विद्यार्थ्यांची दाखविलेली पटसंख्या तसेंच प्रत्यक्षात विद्यार्थी उपस्थिती आधारकार्डशी लिंक, विद्यार्थी तपासणी अहवाल याबाबतची माहिती परस्परांशी विसंगत असल्याचे त्याचसुमारास आढळून येणे, याबाबतची माहिती मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे माहिती मागविण्यात येणे, तथापि सदर माहिती अद्याप पुरविण्यात न येणे, परिणामी मागविलेली माहिती देण्याऐवजी स्थानिक लोकप्रतिनिधी हे आमच्या संस्थाप्रमुखाचे राजकीय विरोधक असल्यामुळे ते राजकीय द्वेषापोटी सदर माहिती मागत आहेत असे संस्थेच्या मुख्याध्यापकाने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना लिखित स्वरुपात कळविण्यांत आले असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामुळे मा.लोकप्रतिनिधींचा अवमान व उपमर्द झाल्याचे स्पष्टपणे दिसून येणे, परिणामी, या संस्थांच्या शाळांच्या व्यवस्थापनाने शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासन निधीचा गैरव्यवहार करण्यांत आल्याचा व्यक्त होत असलेला संशय, त्याबाबत चौकशी करण्यासाठी स्वतंत्र प्रशासक नेमून शासनाने संबंधित दोन्ही (प्राथमिक व माध्यमिक) शिक्षण अधिकाऱ्यांसह संस्था व्यवस्थापनांविरुध्द चौकशी करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात** : **सर्वश्री अजित पवार, अजय चौधरी, अनिल पाटील, अमित देशमुख, अमित झनक, अशोकराव चव्हाण, आदित्य ठाकरे, इंद्रनिल नाईक, कैलास गोरंट्याल, चंद्रकांत नवघरे, छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, दिलीप वळसे-पाटील, देवेंद्र भुयार, धर्मरावबाबा आत्राम, धिरज देशमुख, नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री नितीनकुमार देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखडे, बाबासाहेब पाटील,**

**बाळासाहेब आजबे, भास्कर जाधव, मनोहर चंद्रिकापूरे, मोहनराव हंबर्डे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रणजीत कांबळे, रविंद्र वायकर, राजु पारवे, राजू कारेमोरे, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री राजेश टोपे, राजेश एकडे, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री विकास ठाकरे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, विनोद निकोले, संजय बनसोडे, संदिप क्षिरसागर, सहसराम कोरोटे, सुनिल केदार, सुनिल प्रभू, सुभाष धोटे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, धनंजय मुंडे, माधवराव पाटील-जवळगावकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

“राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची आवश्यकता, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, तसेच, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील पिकांचे, विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करुन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारले असणे, विदर्भात कापसावर लाल्या रोगाचा व संत्र्यांवर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असणे, विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात सहा दिवसांत सात युवा शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असणे, “शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करु” ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, सन २०१५ ला २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व २०२१ ला निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे,

बांगलादेश सरकारने आयात शुल्कात वाढ केल्याने, मागणी करुनही केंद्र सरकारने हस्तक्षेप न केल्याने व राज्यसरकारनेही केंद्रसरकारकडे पाठपुरावा न केल्याने विदर्भातील संत्र्याच्या निर्यातीत ८० ते ९० टक्के घट येऊन शेतकरी अडचणीत आला असणे, नैसर्गिक आपत्ती व अन्य कारणांमुळे विदर्भातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आला असताना सोयापेंड व कापूस आयात शुल्काबाबत निर्णय न घेतला जाणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचे धान विक्रीअभावी पडून असणे, विदर्भात अधिवेशन सुरु असताना माओवाद्यांनी स्थानिक आमदार आणि प्रशासनाला परिणाम भोगण्याची धमकी दिलेली असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील प्रकल्प खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, भिलाईप्रमाणे मोठ्या प्रकल्पाची संधी महाराष्ट्राने गमावली असणे, यावर फेरविचार होण्याची आवश्यकता असणे, विदर्भात खनिज उत्खननानंतर त्यावर आधारित उद्योगांची उभारणी विदर्भातच व्हावी, अशी विदर्भवासियांची मागणी असणे, नांदेड ते जालना या द्रुतगती जोडमहामार्गाचे काम तसेच समृध्दी महामार्गाचे विस्तारीकरण नागपूर ते भंडारा-गोंदिया आणि नागपूर ते गडचिरोली करण्याची आवश्यकता, समृध्दी महामार्गाच्या नियोजित आराखड्यातील कृषी क्लस्टरांचे काम प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणत्याही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे प्रलंबित प्रश्न, तसेच, विदर्भातील सॅफ्रन प्रकल्प, राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य संस्थान (एनआयएमएच), केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ (श्रमिक शिक्षा बोर्ड) या संस्था विदर्भातून इतर राज्यात स्थलांतरित करण्यात आल्याने विदर्भवासीयांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झालेली असणे, मागील सरकारने २९ जून, २०२२ रोजी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसणे, एमएसएमई गुंतवणुकीत विदर्भ व मराठवाडा हे दोन विभाग मागे पडले असताना या मागास आणि राज्याच्या इतर भागात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे विदर्भ, मराठवाडा व राज्याच्या इतर भागात येणारे प्रकल्प रखडलेले असणे, मिहान प्रकल्पात गुंतवणूक करार झाले असताना कंपन्यांचा फारसा प्रतिसाद न मिळणे, रोजगार निर्मितीवर त्याचा परिणाम झाला असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असणे, तसेच, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित

अस्वाधीन प्रत

जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : सर्वश्री रणधीर सावरकर, समीर कुणावार, प्रशांत बंब, अभिमन्यू पवार, भरतशेट गोगावले, राम सातपुते, ज्ञानराज चौगुले, राजेश पवार, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री संजय शिरसाट, नारायण कुचे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, रमेश बोरनारे, प्रदिप जैस्वाल, ॲड आकाश फुंडकर, ॲड आशिष जैस्वाल, सर्वश्री दादाराव केचे, बालाजी कल्याणकर, संभाजी पाटील-निलंगेकर, मोहन मते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री किशोर जोरगेवार, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, संजय सावकारे, बच्चू कडू, मंगेश चव्हाण, भिमराव तापकीर, सुरेश भोळे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रशांत ठाकूर, नितेश राणे, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, तानाजी मुटकुळे, हरिभाऊ बागडे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, सुनिल कांबळे, ॲड राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री राम कदम, किसन कथोरे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, टेकचंद सावरकर, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, डॉ. तुषार राठोड, प्रा.डॉ. अशोक उईके, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, प्रकाश भारसाखळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

मागील सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे,

अप्रकाशित प्रत

विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प असेल, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळवून हा प्रदेश सुजलाम् सुफलाम् करणारा प्रकल्प असेल अथवा विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी युती सरकारच्या काळात सन २०१७-१८ च्या दरम्यान मंजूर करण्यात आलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादींचे काम थंड बस्त्यात टाकण्यात येणे, विदर्भ-मराठवाड्यासह उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी वरदान ठरणारा समृद्धी महामार्ग डिसेंबर २०२१ मध्ये सुरू होणे अपेक्षित असताना मागील सरकारच्या संथ कारभारामुळे प्रकल्पाचे काम रखडणे, परंतु नव्या सरकारने जनभावना लक्षात घेऊन नुकतेच समृद्धी महामार्गाचे पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करणे, त्याच वेळेस समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचेही काम तात्काळ पूर्ण होऊन त्याचेही लोकार्पण होण्याची जनतेची वाढती मागणी, एडीबीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हे निवडताना विदर्भातील जिल्ह्यांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास येणे, गत २ वर्षांत विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अतिवृष्टी होऊनही पुरेशी मदत शेतकरी बांधवांना न मिळणे, शेतकऱ्यांची दिवसा वीज मिळण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, मागील सरकारच्या कार्यकाळातील अक्षम्य दुर्लक्षामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषात वाढ होणे, जुलै २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर विदर्भ-मराठवाड्याशी संबंधीत वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशाकडे वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेला चालना मिळणे, रस्त्यांचे जाळे विकसित करण्यासाठी विदर्भ-मराठवाड्यातील जिल्ह्यांना पुरेसा निधी प्राप्त होणे, विदर्भ, मराठवाडा व कोकणातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी नवीन सरकारने विशेष तरतूद करण्याची गरज, तसेच धान, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा याकरीता धान, सोयाबीन व संत्रा इत्यादी आधारीत प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची तसेच, कापसावर प्रक्रिया उद्योगाला गती देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण आणण्याची ज्यामध्ये पारदर्शकता येऊन खऱ्या अर्थाने कापूस प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल अशा तरतूदी असण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात आरोग्य सुविधांना बळकटी मिळण्यासाठी या भागातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची नवीन शासनाने केलेली घोषणा व या घोषणेची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी याकरीता मागील सरकारने कोणतेही विशेष प्रयत्न न करणे, विशेषत: १८ महिन्यांमध्ये कॅबिनेट कमिटी ऑन इंडस्ट्रीजची एकही बैठक न घेणे, परंतु नवीन शासनाने नुकतीच ७०००० कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देऊन विदर्भ-मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करणे, मागील ५ महिन्यांत या सरकारने विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास

अग्रिम प्रत

भागात अनेक प्रकल्पांना चालना मिळालेली असताना पुढील काळात वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणा-या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना तसेच एडीबी व एचएएम योजनेतंर्गत रस्त्यांचे जाळे विकसित करण्याची व संत्रा, धान, सोयाबीन व कापूस इत्यादी पिकांवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी नव्याने धोरण आखण्याची आवश्यकता, विशेषत: SMART, MAGNET योजनेतंर्गत प्रकल्प मंजूर करताना विदर्भ, मराठवाडा या मागास भागाला प्राधान्य देण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ व जलयुक्त शिवार टप्पा-२ ची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याची गरज, शेतक-यांना दिवसा वीज मिळावी याकरीता प्रत्येक सबस्टेशनला मुख्यमंत्री कृषी सौरवाहिनीला जोडण्याची आवश्यकता, तसेच नव्याने उद्योग विदर्भ-मराठवाड्यात यावेत याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही."

**(बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

नऊ : **सर्वश्री समीर कुणावार, मंगेश कुडाळकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री संजय गायकवाड, रणधीर सावरकर, सदा सरवणकर, ॲड॰ आशिष शेलार, श्री.दिलीप लांडे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रकाश आबिटकर, राजेंद्र पाटणी, ज्ञानराज चौगुले, अतुल भातखळकर, संतोष बांगर, डॉ. देवराव होळी, डॉ. बालाजी किणीकर, ॲड॰ आकाश फुंडकर, श्री. अनिल बाबर, प्रा.डॉ. अशोक उईके, सर्वश्री सुहास कांदे, चंद्रकांत निंबा पाटील, सौ. मंजुळा गावित, सर्वश्री संतोष दानवे, राम कदम, सर्वश्रीमती माधुरी मिसाळ, मनिषा चौधरी, सर्वश्री राजेश पवार, सचिन कल्याण-शेट्टी, अभिमन्यू पवार, डॉ. राहुल आहेर, श्री. राम सातपुते, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री कृष्णा खोपडे, नितेश राणे, विनोद अग्रवाल, संभाजी पाटील-निलंगेकर, सुनिल कांबळे, समाधान आवताडे, हरिष पिंपळे, प्रकाश आवाडे, नामदेव ससाणे, किसन कथोरे, प्रताप अडसड, मदन येरावार, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री प्रशांत बंब, योगेश सागर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, मोहन मते, गणपत गायकवाड, सुनिल राणे, सुरेश भोळे, प्रकाश भारसाखळे, जयकुमार रावल, मिहिर कोटेचा, ॲड॰ राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री सुभाष देशमुख, अमित साटम, ॲड॰ पराग अळवणी, श्री. पराग शाह, श्रीमती विद्या ठाकूर, डॉ. भारती लव्हेकर, कॅ.आर.तमिल सेल्वन, श्री.गणेश नाईक, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय केळकर, टेकचंद सावरकर, कृष्णा गजबे, किर्तीकुमार भांगडीया, तानाजी मुटकुळे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, प्रशांत ठाकूर, राणाजगजितसिंह पाटील,**

अप्रकाशित प्रत

**काशिराम पावरा, संजय सावकारे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, संजिवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व सन २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे, मात्र विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजाराचा निधी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिलेला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुध्द महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी फ्रीहोल्ड करण्याकरीता संबंधीत समितीचे गठन तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी

अग्रिम प्रत

करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अंतिम आठवडा प्रस्ताव :**

**सर्वश्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, छगन भुजबळ, नानाभाऊ पटोले, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, दिलीप वळसे-पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, बाळासाहेब पाटील, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, धनंजय मुंडे, अबू आजमी, हसन मुश्रीफ, रईस शेख, विनोद निकोले, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री सुनिल प्रभू, अजय चौधरी, सुरेश वरपुडकर, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री अमीन पटेल, अमित देशमुख, कुमारी आदिती तटकरे, सर्वश्री. अनिल पाटील, रोहित पवार, राजन साळवी, रविंद्र वायकर, चेतन तुपे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, अमित झनक, बाबासाहेब पाटील, संजयमामा शिंदे, बाळासाहेब आजबे, रमेश कोरगांवकर, वैभव नाईक, देवेंद्र भुयार, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"गेल्या सहा महिन्यांच्या काळात महाराष्ट्रातील महापुरुषांचा अवमान करणारी, महाराष्ट्राच्या भूमीचे लचके तोडणारी, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी खेळणारी, महाराष्ट्र हिताशी प्रतारणा करणारी वक्तव्ये, निर्णय, कृती सांविधानिक पदावर असलेल्या व्यक्तींकडून महाराष्ट्रात घडलेल्या असणे, यामुळे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला तडा गेल्याची भावना जनमानसात निर्माण झालेली असणे, अर्धन्यायिक प्रकरणात पदाचा दुरुपयोग केल्याची तसेच मंत्र्यांची व प्रशासकीय यंत्रणांची अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आलेली असणे, तसेच राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यास सरकारला आलेले अपयश, सेक्सटॉर्शन व अन्य अवैध धंद्यात तसेच महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अनुसूचित जमातीच्या महिलेवरील बलात्कार व हत्येचा गुन्हा दडपण्याचा पोलिसांकडून झालेला प्रयत्न, सत्तारुढ लोकप्रतिनिधींच्या आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे राजकीय गुंडगिरीला मिळालेले अभय, राजकीय कुरघोडीतून दाखल होत असलेले गुन्हे, प्रशासकीय यंत्रणा, पोलीस दल व केंद्रीय यंत्रणांचा राजकीय सुडबुध्दीने होत असलेला अतीगैरवापर, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेमुळे मनुष्यबळाचा नाहक वापर होत असणे, विरोधी पक्षाच्या नेत्यांवर असत्य आरोप ठेऊन त्यांना जेलमध्ये डांबून ठेवलेले असणे, अफवा रोखण्यात अपयश आल्यामुळे निरपराध जनतेला झालेली मारहाण, वेठबिगारीसाठी अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींच्या खरेदी-विक्रीच्या उघडकीस आलेल्या घटना, बालगृहात होणारे मृत्यू, अतिरेकी हल्ल्याच्या धमक्यांचे सत्र सुरु असून लोकप्रतिनिधी व उद्योजकांनाही धमक्या आलेल्या असणे, यामुळे महाराष्ट्रातील सर्व गोरगरीब जनतेमध्ये

निर्माण झालेले असुरक्षिततेचे व भीतीचे वातावरण, तसेच सरकारच्या कचखाऊ धोरणांमुळे गेल्या सहा महिन्यात वेदांत-फॉक्सकॉनसह अनेक उद्योग महाराष्ट्राबाहेर गेलेले असणे, महाराष्ट्रात गुंतवणूक होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा दिसलेला अभाव, परिणामी महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या हिरावलेल्या रोजगाराच्या संधी, मुंबई-महाराष्ट्रातील आस्थापना राज्याबाहेर स्थलांतरित करुन मुंबई-महाराष्ट्राची शक्ती कमी करण्याचा झालेला प्रयत्न, उद्योगासाठी जमिनी वाटप करण्याच्या एमआयडीसीच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळे हजारो लघु व मध्यम उद्योग उभारण्यात अडथळा निर्माण झालेला असणे, तसेच राज्यातील काही महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या डबघाईला आल्या असून त्यांचा विकास कामांवर परिणाम होत असल्यामुळे घसरलेल्या आर्थिक परिस्थितीची कारणे शोधण्याची आवश्यकता, तसेच "आनंदाचा शिधा" ही योजना नियोजनाअभावी अपयशी ठरली असणे, या योजनेत झालेला भ्रष्टाचार व गैरप्रकार, मागील सरकारने यशस्वीपणे राबविलेल्या शिवभोजन थाळी योजनेकडे सरकारचे दुर्लक्ष होत असणे, तसेच राज्यात शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार झाले असणे, आजही दोषी उमेदवार कार्यरत असणे, कमी पटसंख्येच्या शासकीय शाळा बंद केल्यामुळे ग्रामीण, दुर्गम, आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असणे, शासनाच्या "आपले गुरुजी" उपक्रमाला शिक्षक व पालकांकडून होत असलेला तीव्र विरोध, आठवीऐवजी तिसरीपासून परीक्षा घेण्याबाबत राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी व्यक्त केलेला मानस, परिणामी शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली संदिग्धता, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा स्थगित झाली असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराला विलंब होत असणे, राज्यातील खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यांतील ६५ हजार विना आणि अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून, २०१४ व नोव्हेंबर, २०१५ मधील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करण्याची होत असलेली मागणी, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे करण्याची घोषणा राज्यसरकारने केली असली तरी त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नसणे, राज्यात काही शैक्षणिक संस्थांनी मान्यता न घेता फिजिओथेरपीचे अभ्यासक्रम सुरु केले असणे, राज्यावर करोना महामारीचे संकट पुन्हा घोंगावत असल्याने त्याबाबत तातडीने करावयाच्या उपाययोजना, गेल्या ६ महिन्यात कुपोषणाचे वाढलेले प्रमाण, व्हेंटिलेटरअभावी नागपूरच्या मेडिकल हॉस्पिटलमध्ये १७ वर्षाच्या मुलीचा झालेला मृत्यू, जव्हार तालुक्यातील २१ वर्षीय मातेची रस्त्याअभावी जंगलात प्रसूती होणे, स्व.बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गासारख्या महामार्गांवर १०८ च्या रुग्णवाहिका, इंडिकेटर व इतर आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, समृध्दी महामार्गाचे काम युध्दपातळीवर होत असताना मात्र मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम १३ वर्षे रखडलेले असणे, या महामार्गाची झालेली दुरावस्था, अतिवृष्टीमुळे राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांची झालेली दुरावस्था, राज्यात महागाईचा आगडोंब उसळलेला असणे, या सर्व प्रश्नांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अप्रकाशित

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"धुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेती पंपासाठी विद्युत कनेक्शन मिळविण्यासाठी पैसे भरलेले असले तरी त्यांना अद्यापपावेतो विद्युत कनेक्शन देण्यात आलेले नसणे, वीज पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी शेतकऱ्यांकडून सिंगल फेज ट्रान्सफार्मरची मागणी करण्यात आलेली असणे, नवीन वस्त्यांमध्ये व आदिवासी वस्तीत इलेक्ट्रिक पोलची कामे प्रलंबित असणे, शेती पंपाचे नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर वेळेवर बदलून मिळत नसणे, ग्रामीण भागात इलेक्ट्रिक पोलच्या तारा नादुरुस्त असून त्या बदलून नवीन पोलची मागणी शेतकरी बांधवांकडून करण्यात येणे, ग्रामपंचायतीच्या नळ पाणीपुरवठा योजनेसाठी नवीन ट्रान्सफॉर्मरची मागणी होणे, वाढीव वीज बिलाबाबत ग्राहकांच्या अनेक तक्रारी असणे, ग्रामीण भागात, शेती शिवारात विद्युत तारा लोंबकळलेल्या अवस्थेत असणे, त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होणे, ग्रामीण भागातील सामान्य जनता व शेतकरी बांधवांच्या अनेक समस्या व विविध मागण्या असून या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, धुळे तालुक्यातील ऊर्जा विषयी समस्या मार्गी लावण्यासाठी शासनाने जास्तीचा निधी तातडीने मंजूर करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) ॲड‌ः पराग अळवणी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील विमानतळ परिसरातील इमारती या ५० वर्षाहून अधिक काळापासून अस्तित्वात असणे, अनेक इमारती या जीर्ण अवस्थेत असून काही मोडकळीस आल्या असल्याचे निदर्शनास येणे, येथील इमारती दोन ते तीन मजल्याच्या असून उंचीची मर्यादा असल्याने या इमारतींना लागू करण्यात आलेल्या चटई क्षेत्रफळात सदर इमारतींचा पुर्नविकास शक्य होत नसणे, सदर एअरपोर्ट रनवे फनेलमध्ये येणाऱ्या इमारतींचा पुर्नविकास करताना अतिरिक्त एफएसआय व टीडीआरचा लाभ मिळण्यासाठी प्रारूप विकास नियंत्रण नियमावली २०३४ मध्ये विशेष तरतूद करण्याबाबत तत्कालीन

अप्रकाशित

मुख्यमंत्री यांनी निर्देश दिलेले असणे, याबाबत नगरविकास विभागाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने अंतिम निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २८ डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

अग्रधारित प्रत